E-Mail : mssppsankushnagar@gmail.com

मत्स्योदरी शिक्षण संस्था जालना, संचलित

# पार्थ प्राथमिक शाळा,अंकुशनगर

## ता.अंबड, जि.जालना.

फोन नं : (02483) 243502 शाळा वेतनपथक कोड : 16 / 29

श्री.पंढरीनाथ बी.चव्हाण ( M.A.D.Ed ) मुख्याध्यापक मो. 9422591385

मा.ना.राजेश अं. टोपे (B.E.) माजी उच्च,व तंत्र शिक्षण मंत्री सचिव

मा.ॲड.अंकुशराव रा.टोपे (B.Sc,LLB) (माजी खासदार ) अध्यक्ष

जा.क्र.पाप्राशाअं. / 2014 –15 / 19(?) दिनांक : 14 / 06 / 2014

अनुसूचि ड नियम 9(5)पहा

**नियुक्ती आदेश**

प्रति,
श्री.मोरे श्रीराम बाबासाहेब
मु.पो.पिंपरखेड बु. ता.घनसावंगी
जि.जालना

1) आपल्या दि. 06 / 06 / 2014 च्या अर्जा संदर्भात याद्वारे आपणास कळविण्यात येत आहे की, दि. 16 / 06 / 2014 पासून किंवा रुजू व्हाल त्या दिनांकापासून या शाळेवर **विना – अनुदान तत्वावर सहशिक्षक** या पदावर वेतनबॅड पी.बी.–1 रु.5200–20200 ग्रेड – पे 2800 या वेतनावर नियुक्ती करण्यात येत आहे.शासनाने वेळोवेळी मंजूर केल्याप्रमाणे आपणास स्थानिक पुरक भत्ता,घरभाडे भत्ता,महागाईभत्ता या सारखे भत्ते मिळण्याचा हक्क असेल
2) आपली नियुक्ती ही रिक्त झालेल्या पदावर दि. 16 / 06 / 2014 ते दि.15 / 06 / 2016 पर्यंतच्या कालावधीसाठी अंगदी तात्पुरत्या स्वरुपाची आहे.वरील कालावधी संपल्यावर कोणत्याही सूचनेशिवाय आपली सेवा समाप्त होईल.दोन वर्षासाठी किंवा परिविक्षाधिन कालावधीकरिता आपली नियुक्ती केलेली आहे.
3) आपल्या नोकरीच्या अटी आणि सेवेच्या शर्ती ह्या महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती)विनियमात अधिनियम 1977 आणि त्या खाली तयार केलेले नियम या मध्ये घालून दिल्या प्रमाणे असतील.
4) पदावर रुजु झाल्याच्या तारखे पासून तीन महिन्याच्या आत आपणाला मा.जिल्हा व शल्य चिकित्सक अधिकारी,सामान्य रुग्णालय जालना.यांचे कडून वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी लागेल. ज्या डॉक्टराचे नाव वर उल्लेखिलेले आहे त्यांच्याकडुन शारीरिक पात्रता प्रमाणपत्र मिळण्याच्या शर्तीवर आपली नियुक्ती करण्यात येत आहे.
5) कृपया या नियुक्ती आदेशाची पोच द्यावी,आणि हा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत नियुक्ती स्विकारण्याबाबतचे उत्तर कळवावे.
6) शासन निर्णय क्र.अंनियो – 1005 / 126 / सेवा– 4 / दिनांक 31.10.2005 नुसार दिनांक 01.11.2005 रोजी अथवा त्यानंतर नियुक्त शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी वेतन योजना ऐवजी परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू करण्यात येईल.

पाठीमागे ....